MHPU13008962026

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२९२/२०२६

निशाणी क्र. ३

**मे. तुकाराम प. मोटे सो., न्यायदंडाधिकारी वर्ग-१, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे यांचे न्यायालयात.**

## आरोपाचा सारांश

| | | |
|---|---|---|
| **१.** गुन्हा घडल्याची तारीख | – | ०१.०७.२०२६ |
| **२.** फिर्याद दिल्याची तारीख | – | ०१.०७.२०२६ |
| **३.** फिर्यादीचे नांव व पत्ता | – | **महाराष्ट्र सरकार** |
| **४.** आरोपीचे नांव व पत्ता | – | सौरभ दत्तात्रय कटके, वयः २८ वर्ष, धंदाः व्यवसाय, रा. झेंडेवाडी, ता.पुरंदर, जि.पुणे. |
| **५.** फिर्याद ज्या कलमाखाली दिली ते | – | महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ आर, डब्ल्यु अन्वये. |

**६. गुन्ह्याचा तपशील**

तुम्ही आरोपीने दि.०१.०७.२०२६ रोजी रात्री ०२.१५ वाजता मौजे झेंडेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे दिवे घाटाजवळ तुम्ही तुमचे ताब्यातील हॉटेल जगदंब हे शासनाने निर्धारित करुन दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ चालू ठेवल्याने तेथे होणाऱ्या गर्दीमूळे रस्त्यावरील वाहनांना रहदारीस व लोकांना वाहतुकीस अडथळा निर्माण केला त्यायोगे, तुम्ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ आर, डब्ल्यु अन्वये. सहकलम १३१ अन्वये गुन्हा केला आहे.

**( तुकाराम प. मोटे )**
न्यायदंडाधिकारी वर्ग-१,
(न्यायालय क्र.१), सासवड.

दिनांकः ०२.०७.२०२६
ठिकाणः सासवड.

**७. आरोपीचा जबाब.**

**प्रश्न क्र.१. –** तुम्हाला आता तुमच्यावर ठेवणेत आलेल्या वरील आरोपाचा सारांश मराठीत

वाचून दाखविण्यात आला. तो तुम्हाला समजला का ?

**उत्तरः–** **होय.**

**प्रश्न क्र.२. –** तुम्हाला दोषारोपपत्राची प्रत मिळाली काय ?

**उत्तरः–** **होय.**

**प्रश्न क्र.३. –** तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

**उत्तरः–** **होय, मला गुन्हा कबुल आहे.**

..............................

**आरोपीची स्वाक्षरी / अंगठा**

समक्ष

**( तुकाराम प. मोटे )**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
(न्यायालय क्र.१), सासवड.

दिनांकः ०२.०७.२०२६
ठिकाणः सासवड.

## <u>न्यायनिर्णय</u>

आरोपीने गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीची कबूली स्वेच्छेने आहे. त्यामुळे, ती मी स्विकारीत आहे. आरोपीचे असे कथन आहे की, तो कुटूंबाचा कर्ता असून कुटूंब त्याचेवर अवलंबून आहे. त्यामुळे कमीत–कमी दंड करण्यात यावा. आरोपीचे सदर कथन विचारात घेता आरोपीला महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ आर, डब्ल्यु अन्वये. सहकलम १३१ अन्वये दोषी धरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी सौरभ दत्तात्रय कटके, यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ आर, डब्ल्यु अन्वये. सहकलम १३१ अन्वये शिक्षापात्र अपराधाकरीता दोषी धरण्यात येत आहे व भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ नुसार रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड भरण्याची व दंड न भरल्यास ४ दिवस साधी कैदेची शिक्षा देण्यात येत आहे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

**दंड / पेनल्टी रोख / जामीन / पोटगी / कॉस्टची रक्कम रु.** ५००/- पाचशे **पा.न.** 95 **ने दि.** ०२/०७/२६ **रोजी जमा केली असे**

**सहा. अधिक्षक**
**सिव्हील व फौजदारी कोर्ट**
**सासवड. जि. पुणे.**

**02 JUL 2026**

दिनांकः ०२.०७.२०२६
ठिकाणः सासवड.

**( तुकाराम प. मोटे )**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१,
(न्यायालय क्र.१), सासवड.